मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# चिखली-आकुर्डी रस्त्यावरून चारचाकी न्यायला 'नको रे बाबा'!

## वाहनचालकांना होतोय मनस्ताप, कर्णकर्कश्य आवाजने आजुबाजूचे रहिवाशीही त्रस्त

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**


तळवडे ते मोशी आणि चिखली ते आकुडी या रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत. सकाळी दहा आणि सायंकाळी पाचनंतर रस्त्यावरून चारचाकी न्यायची म्हटल्यास पाच मिनिटाच्या अंतरासाठी अर्धा तास वेळ वाहतूक कोंडीमुळे जातो आहे. वाहतूक विभागाकडे अपुरे मनुष्यबळ असल्याम ुळे या रस्त्यावर गैरसोय होताना दिसून येतेय. याचा परिणाम म्हणजे किरकोळ अपघात, वाद आणि हॉर्न च्या कर्णकर्कश्य आवाजाने रस्त्याच्या बाजूच्या सोसायटीधारकांना त्रास होतो आहे. वाहतूक कोंडीवर तोडगा काढा अशी मागणी होते आहे.

सकाळी मुलांना शाळेत सोडताना, नोकरदारांना कामावर जाताना तळवडे ते मोशी भारतामाता चौक आणि चिखली बसस्टॉप ते आकुडी रस्त्यावर तसेच सोनवणे वस्ती ते सत्संग रस्ता या ठिकाणी म ोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते आहे. चिखली-आकुडी रस्त्यावर नेवाळे चौकात रस्त्याच्या कडेला खोदकाम केल्यामुळे अजूनच जास्त त्रास वाढला आहे. त्यामुळे रस्त्यावरून चारचाकी गाड्या न्यायच्या म्हटले की नको नको होते.




> 
> या रस्त्यावरून होणा-या वाहतूक कोंडीला नियंत्रित ठेवण्यासाठी वाहतूक विभागाकडे वाहतूक पोलिसांची संख्या वाढवण्याची मागणी केली आहे. अडवे-तिडवे वाहने रस्त्यात घातल्यानेही वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वाहतूक पोलिस असल्यास नियंत्रण राहते. त्यासाठी या रस्त्यांवर वाहतक पोलिसांची संख्या वाढवण्याची मागणी केली आहे.
> –साधना मळेकर, माजी नगरसेविका

> 
> देहू कॅन्टोन्मेंट शनिमंदीर कमानपर्यत, तळवडेत ब्लू डायमंड हॉटेलपर्यत त्रिवेणीनगर ते साने चौक या परिसरासाठी माझ्याकडे फक्त अकरा वाहतूक पोलिस आणि पाच वॉर्डन आहेत. कार्तिकी वारीमुळे तिकडेही बंदोबस्त देण्यात आला होता. या परिसरासाठी मनुष्यबळ वाढवावा अशी मागणी करणार आहे.
> –सुनील टोनपे, तळवडे वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक

> 
> चिखली हा परिसर इंडस्ट्रीयल आहे. या परिसराचा विकास मोठ्या प्रमाणात व्हायला पाहिजे होता. कनेक्टीव्हीटी आहे मात्र डेव्हलपमेंट झाली नाही. त्यामुळे चिखलीपेक्षा मोशी परिसरात सर्वाधिक गृहप्रकल्प गेले. चिखली आकुडी रस्ता अरूंद असल्याने वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. यारस्त्याचे रूंदीकरण प्राधान्याने व्हायला पाहिजे. या रस्त्यावरून एखादी रूग्णवाहिका काढायची म्हटल्यासही शक्य नाही. त्यामुळे रूग्णांचे काय हाल होत असतील याचा विचार करा. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्त्याचे रूंदीकरण हा पर्याय आहे.
> –मनोज जरे, सामाजिक कार्यकर्ते

> 
> पार्श्व सोसायटी चिखली रहीवाशी- चिखली-आकुडी रस्ता आणि सोनवणे वस्ती ते सत्संग रस्त्यांवर सायंकाळी होणार कोंडी हा नित्याचाच त्रास झाला आहे. रस्त्याच्या बाजूला असणा-या सोसायटीधारकांना गाड्यांच्या हॉर्नचा कर्नकर्कश्य आवाज नकोसा होतो. या वाहतूक कोंडीमुळे पाच मिनिंटाच्या रस्त्याचे अंतराला अर्धा तास लागतो. त्यामुळे सायंकाळी चारचाकी गाड्या बाहेर काढायलाही नकोसे होते
> –सूरज ससार,

# तळवडे दुर्घटनेतील आणखी दोन जखमींचा मृत्यू

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

परिसरात होतेय हळहळ

तळवडे येथे कंपनीम ध्ये लागलेल्या आगीत जखमी झालेल्यापैकी दोन तरुणींचा ससून रुग्णालयात आज मृत्यू झाला. तळवडे (ढश्रुरवश) येथे ज्योतिबा मंदिरामागे बर्थडे केक वरील फायर क्रॅकरच्या कारखान्यात झालेला स्फोट आणि लागलेल्या आगीत होरपळून सहा महिला काम गारांचा जागीच मृत्यू झाला होता. यापैकी एकूण दहा जणांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

आज सकाळी १६ वर्षीय प्रतीक्षा तोरणे हिचा मृत्यू झाला. प्रतीक्षा हिची २६ वर्षीय बहीण अपेक्षा हि देखील ४० टक्के भाजली आहे. या घटनेवर या दोघींच्या वडिलांनी अशोक तोरणे यांनी नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

या घटनेत ३१ वर्षीय शिल्पा आणि ४५ वर्षीय कविता राठोड या मायलेकी देखील एडमिट आहेत. त्यांची परिस्थिती पाहून त्यांच्या पतीने देखील टाहो फोडला आहे.

नीलम गो-हे यांनी आज रुग्णांना भेट दिली असता एका रुग्णाने चेह-यावर सूज असताना देखील संवाद साधला. यावेळी रुग्णाने या घटनेत कोणाचीही चूक नसून आमच्या पाठीशी कोण आहे? असा प्रश्न केला असता त्यांच्या पाठीशी सरकार असल्याचे गो-हे यांनी आश्वासन दिले.

# महापालिका आयुक्त सल्लागारावर मेहरबान

## दुसऱ्यांदा मुदतवाढ, तीन कोटी उधळणार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**



महापालिकेचे प्रकल्प व विकासकामांवर नियंत्रण ठेऊन सल्ला देणाऱ्या पॅलेडियम कन्सल्टंट इंडिया या खासगी संस्थेवर आयुक्त शेखर सिंह मेहरबान झाले आहेत. संस्थेला दुसऱ्यांदा थेटपणे एका वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली. दरमहा २५ लाखांप्रमाणे या संस्थेला दोन कोटी ९० लाख रुपये वर्षभरासाठी दिले जाणार आहेत. महापालिकेच्या स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, जलनि:सारण विभागाची विकासकामे आणि प्रकल्पांना गती देण्यासाठी महापालिकेने सिटी ट्रान्सफॉर्मेशन कार्यालयाची (सीटीओ) निर्मिती केली आहे. त्याचे कामकाज पॅलेडियम कन्सल्टंट ही खासगी संस्था पाहत आहे. २०१७ मध्ये या संस्थेला काम दिले होते. दोन वर्षांसाठी ही नियुक्ती होती. त्यानंतर संस्थेला एक वर्षे वाढवून दिले होते. या संस्थेचे कर्मचारी महापालिका भवनातच काम करत आहेत. मुदत संपल्यानंतर माहिती व तंत्रज्ञान विभागाने निविदा काढली होती. त्यातही या संस्थेलाच काम मिळाले. लघुत्तम दर असल्याने संस्थेची नियुक्ती केली. एक नोव्हेंबर २०२१ पासून वर्षभरासाठी संस्थेची नेमणूक करण्यात आली होती. मुदत संपण्यापूर्वी महापालिका प्रशासनाने निविदा प्रक्रिया राबविली नाही. या संस्थेला एक नोव्हेंबर २०२२ पासून एका वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. या संस्थेची मुदतवाढ ३१ ऑक्टोबर २०२३ ला संपली. त्यामुळे एक नोव्हेंबर २०२३ पासून थेटपणे दुसरी मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव माहिती व तंत्रज्ञान विभागाने स्थायी समितीसमोर ठेवला. संस्थेला एक वर्ष मुदतवाढ देण्यासाठी प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली. त्यामुळे ही संस्था ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत महापालिकेला सल्ला देणार आहे.

# पिंपरी-चिंचवड शहरात एक हजार ३५१ कुणबी नोंदी

## महसूल अधिकाऱ्यांकडे कुणबी दाखल्यासाठी अर्ज करावा लागणार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**




मराठा समाजाला कुणबी दाखले देण्यासाठी महापालिकेच्या विविध विभागांतील जुनी कागदपत्रे, दस्तऐवज व दप्तरामधील नोंदी तपासणीचे काम पूर्ण झाले. महापालिकेने एक लाख ३४ हजार ६०२ नोंदी तपासल्या असून एक हजार ३५१ मराठा-कुणबी जातीच्या नोंदी आढळून आल्या आहेत. याबाबतचा अंतिम अहवाल अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला आहे. राज्य शासनाच्या आदेशानुसार महापालिकेतील सन १९४८ ते १९६७ या आणि सन १९४८ पूर्वीच्या कालावधीतील दस्तऐवज व कागदपत्रांतील नोंदणी तपासण्यात आल्या. शिक्षण, कर आकारणी व कर संकलन, वैद्यकीय व लेखा विभागांतील या कालावधीतील उपलब्ध दस्तऐवज, कागदपत्र व नोंदी तपासल्या आहेत. वैद्यकीय विभागातील दोन हजार २२२ आणि कर संकलनमधील ११ हजार ९९३ कागदपत्रांवरील नोंदी तपासण्यात आल्या. त्यात एकही मराठा-कुणबी नोंद आढळून आलेली नाही. शिक्षण विभागातील सर्वाधिक एक लाख २० हजार ३८७ नोंदी तपासल्या. १९४८ ते १९६७ या कालावधीतील ७७ हजार ७२६ नोंदीची तपासणी केल्यानंतर १९८ मराठा-कुणबी जातीच्या नोंदी आढळून आल्या. तर, १९४८ पूर्वीच्या कालावधीतील शिक्षण विभागातील ४२ हजार ६६१ नोंदी तपासल्या त्यापैकी एक हजार १५३ कुणबी नोंदी आढळल्या. महापालिकेने एक लाख ३४ हजार ६०२ नोंदी तपासल्या असून एक हजार ३५१ कुणबी जातीच्या नोंदी आढळून आल्या आहेत. या कुणबी नोंदी गावनिहाय तयार केल्या जाणार आहेत. महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ऑनलाइन नोंद दिसल्यानंतर नक्कल मिळण्यासाठी महापालिकेकडे लेखी अर्ज करावा लागणार आहे. नक्कल घेऊन महसूल अधिकाऱ्यांकडे कुणबी दाखल्यासाठी अर्ज करावा लागणार आहे. त्यानंतर कुणबी दाखला मिळणार आहे.

> **“पुणे शहराभोवतीचा रिंगरोडसाठी जिल्हा प्रशासनाने ६३० हेक्टर म्हणजेच सुमारे १६०० एकर जमीन संपादनाचे निवाडे जाहीर केले आहेत. त्यात २७० हेक्टर हे संमतीने संपादित करण्यात आले आहेत. तर ३७० हेक्टर विनासंमतीने संपादित करण्यात येणार असून त्याचे निवाडे जाहीर करण्यात आले आहे.**
> **- डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी**

मराठा समाजाला कुणबी दाखले देण्यासाठी महापालिकेच्या विविध विभागांतील जुनी कागदपत्रे, दस्तऐवज व दप्तरामधील नोंदी तपासणीचे काम पूर्ण झाले. महापालिकेने एक लाख ३४ हजार ६०२ नोंदी तपासल्या असून एक हजार ३५१ मराठा-कुणबी जातीच्या नोंदी आढळून आल्या आहेत. याबाबतचा अंतिम अहवाल अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला आहे. शिक्षण विभागातील सर्वाधिक एक लाख २० हजार ३८७ नोंदी तपासल्या. १९४८ ते १९६७ या कालावधीतील ७७ हजार ७२६ नोंदीची तपासणी केल्यानंतर १९८ मराठा-कुणबी जातीच्या नोंदी आढळून आल्या. तर, १९४८ पूर्वीच्या कालावधीतील शिक्षण विभागातील ४२ हजार ६६१ नोंदी तपासल्या त्यापैकी एक हजार १५३ कुणबी नोंदी आढळल्या.

# आजचे मोदी हे बाळासाहेब ठाकरेंची कृपा!

## सुषमा अंधारे यांची उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** आजचे मोदी हे बाळासाहेब ठाकरेंची कृपा असल्याचं वक्तव्य ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केलं आहे. पुण्यात ठाकरे गटाकडून मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. दरम्यान या मेळाव्यात ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊतांनी हजेरी लावली होती. पुण्यातील आंबेडकर महाविद्यालयाच्या मैदानावर ठाकरे गटाकडून जाहीर सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. या मेळाव्याला ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे (डीहार अपवहरॲश) यांनी देखील हजेरी लावली होती. गुजरातमधील दंगलीनंतर अटलबिहारी वाजपेयी मोदींना मुख्यमंत्री पदावरुन काढायचं म्हणत होते. राजधर्माची आठवण करुन द्यायला अटलजी विसरले नव्हते. पण जेव्हा अडवाणी बाळासाहेब ठाकरेंना विचारायला आले होते तेव्हा बाळासाहेब ठाकरेंनी सांगितलं होतं, नरेंद्र मोदी गया तो गुजरात गया. तुम्ही नरेंद्र मोदींना काढू नका. जेव्हा अख्ख जग टीका करत होतं, तेव्हा बाळासाहेबांनी हे सांगितलं होतं. पण आता देश म्हणतोय की, नरेंद्र मोदी वापस आया तो पुरा देश गया. त्यामुळे मोदी जर पुन्हा आले तर लोकशाही, स्वातंत्र्य सर्व काही जाईल, असं म्हणत राऊतांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ही शिवसेना हा उसळता सागर आहे. पुण्याच्या मैदाना ही शिवसेना कशी उतरते बघा, असं म्हणत राऊतांनी फडणवीसांना देखील थेट इशारा दिलाय. आम्हाला शिल्लक सेना म्हणता. २०२४ नंतर तुम्हीच शिल्लक राहणार का हा विचार करा. या महाराष्ट्रात ज्याला शिल्लेक सेना म्हणती तीच सेना आम्ही पुन्हा सत्तेवर आणून दाखवू, असं संजय राऊतांनी म्हटलं. या देशाचा काळ पैसा जो बाहेर गेला त्याच काय झालं, असा सवाल राऊतांनी यावेळी उपस्थित केलाय. १५ लाखाचा काय झालं,भ्रष्टाचारांना फासावर लटकावू उद्याचं काय झालं, अजित पवार हसन मुश्रीफ यांचं काय झालं, प्रफुल पटेल भावना गळी राहुल



शेवाळे यांचे काय झालं. ईडी त्यांना अटक करायला गेली होती, त्याचं काय झालं, हे प्रश्न देखील राऊतांनी या निमित्ताने उपस्थित केले आहेत. देशातला दहशतवाद पूर्णापणे संपवू असं सांगितलं होतं मणिपूर मध्ये काय सुरू आहे. आम्हाला डोळे वटारुन दाखवता चीनला डोळे वटारा, असं संजय राऊतांनी म्हटलं. आजही हजारो काश्मीर पंडित निर्वासितांचे जीवन जगतात, काश्मिरी पंडितांच काय झालं ते सांगा. अनेक काश्मिरी पंडित बाळसाहेब ठाकरे यांना मानतात. कारण बाळासाहेबांनी कश्मीरी पंडितासाठी काम केलं याला म्हणतात हिंदुहृदयसम्राट. समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणार होतात कुठे आहे पुतळा. हे एक नंबरचं खोटं सरकार देशात आहे, असं राऊतांनी म्हटलं. डरपोक लोकांनी शिवसेना घाबरून शिवसेनेला फोडलं. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी काय केलं मराठी माणसाच शौर्य संपवण्याच काम केलं. या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले हे त्यांच्या मनात आहे, असं राऊतांनी म्हटलं. शिवसेना ही बाळासाहेब ठाकरे यांचीच.ही शिवसेना कुण्या आयऱ्या गौऱ्याची नाही. आशा एकनाथ शिंदेंना देता आणि तुम्ही सांगता का ही शिवसेना तुमची? शरद पवार साहेब हयात आहेत, निवडणूक आयोगासमोर जाऊन बसतात तरी निवडणूक आयोगाला प्रश्न पडला की राष्ट्रवादी कोणाची. उद्धव ठाकरे असताना निवडणूक आयोगाला प्रश्न पडतो की शिवसेना कुणाची, राज्यात सध्या काय सुरू आहे एक मुख्यमंत्री दोन मुख्यमंत्री, एक फुल दोन डाऊट फुल, असं म्हणत राऊतांनी सरकारवर निशाणा साधला. मला जेलमध्ये नेले तेव्हा माझ्यावर देखील दबाव आणला गेला.. पण मी शिवसेना सोडणार नाही. शिवसेनेची बेईमानी करण्यापेक्षा मरण पत्कारीन. मी घाबरून पळून जाणार नाही. ४० डरपोक पळून गेले पण लाखो मर्दानी सैनिक आमच्या सोबत, हा महाराष्ट्र झुकणार नाही. असे शिंदे मिंदे किती आले आणि गेले. या देशात अनेक सेना आल्या पण शिवसेना आजही तशीच आहे, असं संजय राऊतांनी म्हटलं. आम्हाला शिल्लक सेना म्हणता. २०२४ नंतर तुम्हीच शिल्लक राहणार का हा विचार करा. या महाराष्ट्रात ज्याला शिल्लेक सेना म्हणती तीच सेना आम्ही पुन्हा सत्तेवर आणून दाखवू, असं संजय राऊतांनी म्हटलं.

### एक नंबरचं खोटं सरकार

**» आजही हजारो काश्मीर पंडित निर्वासितांचे जीवन जगतात, काश्मिरी पंडितांच काय झालं ते सांगा. अनेक काश्मिरी पंडित बाळसाहेब ठाकरे यांना मानतात. कारण बाळासाहेबांनी कश्मीरी पंडितासाठी काम केलं याला म्हणतात हिंदुहृदयसम्राट. समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणार होतात कुठे आहे पुतळा. हे एक नंबरचं खोटं सरकार देशात आहे, असं राऊतांनी म्हटलं. डरपोक लोकांनी शिवसेना घाबरून शिवसेनेला फोडलं. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी काय केलं मराठी माणसाच शौर्य संपवण्याच काम केलं. या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले हे त्यांच्या मनात आहे, असं राऊतांनी म्हटलं.**

# मराठ्यांकडे २० टक्के, आमच्याकडे ८० टक्के मतं!

## ओबीसी समाजाला फक्त ९ टक्के मिळाल्या सरकारी नोकऱ्या

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठ्यांकडे २० टक्के , आमच्याकडे ८० टक्के मतं आहेत. ओबीसी समाजाला ( ेलल ठशीशॲॅरींळेप) २७ टक्के आरक्षण आहे. प्रत्येक जमातीला ब्रॅकेट आहे. ओबीसी समाजाला सरकारी नोकऱ्या फक्त ९ टक्के मिळाल्यात. आधी २७ टक्के जागा भरा मग इतर गोष्टी करा, असे म्हणत छगन भुजबळ (उहहरसरप इर्हीक्षलरश्र) यांनी मनोज जरांगे (ारपेक्ष क्षरॲरपश रिंळश्र) यांच्यावर टीकास्त्र सोडले. इंदापूर (ळ्रींपश खपवरीॲ) येथील सभेत मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर सडकून टीका केली.

आमच्या ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देऊ नका, आमची इतर कोणताही मागणी नाही, असेही भुजबळ यावेळी म्हणाले. विचार करणारा मराठा समाज गप्प का ? मराठा समाजाच्या मतांसाठी गप्प आहात का? मतं त्यांची आहेत, मग आमची नाहीत का? त्यांची लेकरं आहेत, मग आमची नाहीत का? असा सवाल यावेळी भुजबळांनी उपस्थित केला. आरक्षण हा गरिबी हटावण्याचा कार्यक्रम नाही, असे भुजबळ म्हणाले. आरक्षणावर अनेक नेते





बोलायला तयार नाहीत. कसली भीती वाटते आहे? मतांची भीती वाटते का? त्यांच्याकडे मते आहेत आमच्याकडे नाहीत का? त्यांची २० टक्के आणि ८० आमची आहेत. हर्षवर्धन पाटील, विजयसिंह पाटील तुम्हाला कुणबी सर्टीफिकेट पाहिजे आहेत का? सांगा ना पाहिजे का नाही? तळागाळातील लोकांना वरती आणले पाहिजेत, आमचे लोक गरिब का राहिले असते पण त्यांना काही काळतच नाही. आम्हाला २७ टक्के आरक्षण आहे. यात अनेक जाती आहेत. सरकारमध्ये फक्त आम्हाला ९ टक्के आरक्षण आहे. ते २७ टक्के भरा मग बाकीचे काही करा. लोकसेवा आयोगात ८५ टक्के मराठा समाज आहे, सारथी, अण्णाभाऊ साठे, शुी मधील ८५ टक्के मराठा समाजाचे, कुणबी आहेत ते आमच्यात आहे. पंजाबराव देशमुख कृषी योजना त्यात मराठा समाज आहे, असे म्हणत भुजबळ यांनी सगळे गणीतच मांडले. कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रात जाती निहाय जनगणना झाली पाहिजे. त्यामध्ये अडचण काय आहे? बिहार करू शकते तर तुम्ही का जनगणना करीत नाही. मराठ्यांना कुणबी सर्टिफिकेट द्यायचे सुरु आहे ते थांबवा. न्यायमूर्ती शिंदे सगळीकडे जात आहेत आणि करून घेत आहेत. आमच्या २७ टक्केंतील आरक्षण दिले पाहिजे. पण ओबीसी मधून आरक्षण देता कामा नये. हे जर ऐकू कुणाला गेलं नाही, न्याय आपल्याला मिळाला नाही. तर पडळकर म्हणाल्याप्रमाणे सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है.. असंच करावे लागेल. मी काही बोललो की, काही विद्वान लोक बोलायला लागतात की दोन जातीत भांडणे लागत आहेत. जरांगे यांच्या सभा रात्री उशिरा चालते, पोलीस कारवाई करीत नाही. कायदा फक्त आपल्याला त्यांना नाही. मी १५ दिवसांनी एकदा बोलतो, सौ सुनार की एक लोहार... काही बोलावे लागते, सगळंच ऐकून घ्यायची सवय नाही.

# शालेय आहारात अंडी वाटपाचा निर्णय मागे घ्या!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय पोषण आहार विभागाने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध भाजप आध्यात्मिक आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. शालेय विद्यार्थ्यांना अंडी ऐवजी देशी गाईचं दूध, सुकामेवा देण्यात यावा. अन्यथा येणाऱ्या २० तारखेच्या आत हा निर्णय मागे घेतला नाही तर आंदोलन करू, शाळांपर्यंत अंडी पोहोचू देणार नाही, असा इशारा भाजप अध्यात्मिक आघाडीने दिला आहे. आळंदीत पत्रकार परिषदेत भाजप अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले यांसह सहसंयोजक किशोर महाराज दोंडगे उपस्थित होते.भाजप अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख तुषार भोसले म्हणाले, महाराष्ट्र शासनाने दुर्दैवी निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने ७ नोव्हेंबर २०२३ ला एक निर्णय काढला आहे. विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारात प्रोटीन मिळावं म्हणून त्यांच्या आहारात अंडीचा समावेश करण्यात आला आहे. राज्य शासनाची भावना चांगली असू शकते. आमचं स्पष्ट मत आहे, की प्रत्येकाच्या कुटुंबाचे नियम असतात. महाराष्ट्रात घरा-घरात वारकरी आहेत. अनेक अध्यात्मिक संप्रदाय आहेत. पहिली, दुसरीत शिकत असलेल्या मुलांनी अजाणतेपणी अंडी खाल्ली तर त्यांच्या कुटुंबातील शुद्ध शाकाहारी नियम मोडण्याचा मोठा धोका सगळ्यांनाच सतावत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नुकतच एक पत्र दिलं आहे. हा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा. अंडीला पर्याय असू शकतात. देशी गाईचं दूध, तूप, सुका मेवा आहे. अंडी हा पर्याय नाही. आम्ही या निर्णयाविरोधात आहोत. मला आशा आहे, राज्यातील वारकरी संप्रदाय, साधू, संत आणि आध्यात्मिक क्षेत्राची भावना तीच आहे. या सर्वांच्या भावनांचा सन्मान करतील आणि हा निर्णय मागे घेतील. सहसंयोजक किशोर महाराज म्हणाले, २० तारखेच्या आत हा निर्णय मागे घेतला नाही तर आम्ही आंदोलन करू, अंडी शाळेपर्यंत पोहचू देणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

## भाजप अध्यात्मिक आघाडीचा इशारा



### वाहतुकीत बदल

» शालेय विद्यार्थ्यांना अंडी ऐवजी देशी गाईचं दूध, सुकामेवा देण्यात यावा. अन्यथा येणाऱ्या २० तारखेच्या आत हा निर्णय मागे घेतला नाही तर आंदोलन करू, शाळांपर्यंत अंडी पोहोचू देणार नाही, असा इशारा भाजप अध्यात्मिक आघाडीने दिला आहे. आळंदीत पत्रकार परिषदेत भाजप अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले यांसह सहसंयोजक किशोर महाराज दोंडगे उपस्थित होते.भाजप अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख तुषार भोसले म्हणाले, महाराष्ट्र शासनाने दुर्दैवी निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने ७ नोव्हेंबर २०२३ ला एक निर्णय काढला आहे. विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारात प्रोटीन मिळावं म्हणून त्यांच्या आहारात अंडीचा समावेश करण्यात आला आहे. राज्य शासनाची भावना चांगली असू शकते.

# आळंदीत कार्तिकी यात्रेसाठी लाखोंची गर्दी!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

कार्तिकी यात्रा आणि संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत.

कार्तिकीएकादशीनिमित्त वारकऱ्यांनी आज माऊलींच्या समाधीचे दर्शन घेऊन शेतकऱ्याला सुगीचे दिवस यावेत, सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, सरकारला सद्बुद्धी द्यावी असे साकडे घातले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी यात्रेनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या जयघोषात दाखल झाले आहेत.

पवित्र इंद्रायणीत स्नान करून माऊलींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी वारकरी दर्शनरांगेत लागले आहेत. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील भाविक मोठ्या प्रमाणावर आले आहेत. यावेळी माऊलींच्या समाधीचं दर्शन घेऊन आलेल्या वारकऱ्यांनी भावना व्यक्त करत ह्या सरकारला सद्बुद्धी द्यावी, त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, शेतकऱ्यांना सुगीचे दिवस यावेत असे साकडे घातल्याचे म्हटले आहे.

नुकतंच, आस्मानी संकटाने शेतकरी संकटात सापडला. अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली होती. अनेक शेतकरी अद्यापही सरकारी मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

## ‘सरकारला सद्बुद्धी द्यावी’, वारकऱ्यांचे माऊली चरणी साकडे!



### लाखो वारकरी आळंदीत दाखल

» कार्तिकी यात्रा आणि संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. कार्तिकी एकादशीनिमित्त वारकऱ्यांनी आज माऊलींच्या समाधीचे दर्शन घेऊन शेतकऱ्याला सुगीचे दिवस यावेत, सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, सरकारला सद्बुद्धी द्यावी असे साकडे घातले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी यात्रेनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या जयघोषात दाखल झाले आहेत.